विशेष सहाय्य योजनेच्या निकषात
सुधारणा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : विसयो-२०२५/प्र.क्र.९२/विसयो**
**मंत्रालय, मुंबई-०३२ ४००**
**दिनांक: २७ मार्च, २०२६.**

**वाचा :-**

१. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विसयो-२०१८/प्र.क्र.६२/ विसयो, दिनांक २०.०८.२०१९,
२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विसयो-२०२०/प्र.क्र.१००/ विसयो, दिनांक ०३.०५.२०२१.
३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विसयो-२०२२/प्र.क्र.८७/ विसयो, दिनांक २२.०६.२०२३.
४. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विसयो-२०२२/प्र.क्र.१२०/ विसयो, दिनांक ०५.०७.२०२३.
५. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विसयो-२०२५/प्र.क्र.६९/ विसयो, दिनांक १५.०९.२०२५.

**प्रस्तावना :-**

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागांतर्गत राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजना आणि केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना या योजना राबविण्यात येत आहेत .

सदरहू योजनेतील लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण डी द्वारे करण्याचा .टी.बी.शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार माहे डिसेंबर ,२०२४ पासून विशेष सहाय्य योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण थेट त्यांच्या आधार संलग्न बॅक खात्यात DBT (Direct Benefit Transfer) Portal मार्फत जमा करण्यात येत आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांना दरमहा रु.१५००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येते. तसेच सदरहू योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात रु.१५००/- वरुन रु.२५००/- इतकी वाढ संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. १ ते ५ येथील शासन निणर्यांन्वये सदरहू योजनांची राज्यात अंमलबजावणी करण्यात येते. सदरहू योजनेच्या निकषात, अटी व शर्तीमध्ये कालानुरुप बदल करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सदरहू योजनेच्या निकषात, अटी व शर्तीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजना आणि केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना या योजनांचा लाभ घेण्यासाठी उपरोक्त संदर्भ क्र.१ ते ४ येथील शासन निर्णयातील नमूद तरतुदीमधील पात्रतेचे निकष, अटी व शर्ती तसेच यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

योजनेच्या पात्रतेसाठी लागणारी माहिती व कागदपत्रे :-

**अ) अर्जदाराची माहिती व तपशील**

| अ.क्र. | | तपशील | |
|---|---|---|---|
| १ | अर्जदाराची माहिती | १. अर्जदाराचा आधार क्रमांक-<br>२. श्री./श्रीमती-<br>३. अर्जदाराचे पूर्ण नांव- (इंग्रजीमध्ये)-<br>४. अर्जदाराचे पूर्ण नांव- (मराठीमध्ये)<br>५. अर्जदाराची जन्मतारीख-<br>६. अर्जदाराचे वय-<br>७. लिंग-<br>८. अर्जदाराचा भ्रमणध्वनी क्रमांक<br>९. अर्जदार दारिद्रयरेषेखालील आहे काय- होय/ नाही.<br>१०. अर्जदाराचा व्यवसाय | १. अनिवार्य<br>२. अनिवार्य<br>३. अनिवार्य<br>४. अनिवार्य<br>५. अनिवार्य<br>६. अनिवार्य<br>७. अनिवार्य<br>८. अनिवार्य<br>९. अनिवार्य<br>१०. अनिवार्य |
| २ | अर्जदाराचा पत्ता | १. अर्जदाराचा पत्ता-<br>२. जिल्हा<br>३. तालुका<br>४. गांव<br>५. पिनकोड<br>६. उपविभाग<br>७. प्रभाग शहरी / ग्रामीण | १. अनिवार्य<br>२. अनिवार्य<br>३. अनिवार्य<br>४. अनिवार्य<br>५. अनिवार्य<br>६. अनिवार्य<br>७. अनिवार्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | योजनेविषयी माहिती | १. अर्जदाराची जात किंवा प्रवर्ग<br>२. योजनेचा प्रवर्ग<br>३. किमान १५ वर्षापासून महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचा पुरावा<br>४. कुटूंबातील व्यक्तींची संख्या<br>५. सर्व मार्गांनी मिळणारे कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न<br>६. दुर्धर आजाराचा प्रकार<br>७. अर्जदार दिव्यांग असल्यास, यु.डी.आय.डी. क्रमांक<br>८. दिव्यांगांचा प्रकार<br>९. दिव्यांगाची टक्केवारी | १. अनिवार्य<br>२. अनिवार्य<br>३. अनिवार्य<br>४. अनिवार्य<br>५. अनिवार्य<br>६. अनिवार्य<br>७. अनिवार्य<br>८. अनिवार्य<br>९. अनिवार्य |
| ४ | बँक खात्याचा तपशील | १. आधार संलग्न बँक खाते क्रमांक<br>२. खाते क्रमाक पडताळणी<br>३. आय.एफ.एस.सी. कोड<br>४. बँकचे नांव<br>५. बँक खातेदाराचे नांव | १. अनिवार्य<br>२. अनिवार्य<br>३. अनिवार्य<br>४. अनिवार्य<br>५. अनिवार्य |
| ५ | अर्जदाराचे | १. स्वंय-घोषणापत्र | १. अनिवार्य |

**ब) विशेष सहाय्य योजनेच्या पात्रतेसाठी खालील कागदपत्रे आवश्यक राहतील :-**

| अ.क्र. | | अर्जदाराचा तपशील | |
|---|---|---|---|
| १ | ओळखीचा पुरावा | १. अर्जदाराचे आधारकार्ड | अनिवार्य |
| | | २. महारोहयो जॉब कार्ड | |
| २ | अर्जदाराचा पत्ता | १. रहिवाशी दाखला<br>२. रेशन कार्ड | |
| ३ | अर्जदाराचा वयाचा पुरावा | १. अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्र /शाळा सोडल्याचे दाखला | |
| ४ | अर्जदाराचा उत्पन्नाचा पुरावा | १. उत्पन्नाचे प्रमाणपत्र (तहसिलदार)<br>२. दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र<br>३. पॅनकार्ड आणि २६ ए.एस. नमुना | |
| ५ | अर्जदाराचा पत्ता आधारकार्ड व्यतिरिक्त | १. मतदान कार्ड किंवा अधिवास प्रमाणपत्र (तहसिलदार) / रहिवाशी दाखला ग्रामपंचायत) | |
| ६ | पात्रतेबाबत पुरावे | १. अर्जदार दिव्यांग असल्यास, यु.डी.आय.डी. कार्ड<br>२. पतीचे मृत्यु प्रमाणपत्र (विधवा महिलांबाबत)<br>३. घटस्फोटाचा पुरावा (न्यायालयीन)<br>४. अनाथ प्रमाणपत्र (ग्राम महसूल अधिकारी व ग्रामसेवक यांची संयुक्त स्वाक्षरीने)<br>५. अत्याचारीत प्रमाणपत्र ( जिल्हा चिकीत्सक/ महिला व बाल विकास अधिकारी/ पोलीस प्रमाणपत्र)<br>६. घटस्फोट प्रलंबित असल्यास त्याबाबत प्रमाणपत्र (ग्राम महसूल अधिकारी व ग्रामसेवक<br>७. तृतीयपंथी प्रमाणपत्र | |

२. विशेष सहाय्य योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण थेट त्यांच्या आधार संलग्न बॅंक खात्यात DBT (Direct Benefit Transfer) Portal मार्फत जमा करण्यात येत आहे. ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी अर्जदारांच्या घरी समक्ष भेट देऊन योजनेसाठी केलेल्या कागदपत्रांची तसेच एकत्रित कुटुंबातील सदस्यांच्या वार्षिक उत्पन्नाची पडताळणी करुन लोकेशनसह फोटो (जिओ-टॅग) पोर्टलवर अद्ययावत करावे. सदरहू योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांची अंतिम निवड करुन पोर्टलवर माहिती अद्ययावत करण्याची जबाबदारी संबंधित नायब तहसिलदार/ तहसिलदार यांची राहील. तथापि, योजनेसाठी पात्र झाल्यानंतर आधार अद्ययावत करणे, आधार कार्ड बॅंक खात्याशी संलग्न करणे इ. जबाबदारी संबंधित लाभार्थ्यांवर निश्चित करण्यात येत आहे. आधार कार्ड व बॅंक यांचेशी संबंधित कारणांनी लाभार्थ्यांना अर्थसहाय्य न मिळाल्यास त्याची जबाबदारी संबंधित लाभार्थ्यांची राहील. तसेच उपरोक्त योजनेसाठी पात्र झालेल्या नवीन लाभार्थ्यांना योजनेचा लाभ हा ऑनलाईनची सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच्या पुढील महिन्यापासून अर्थसहाय्याचे वितरण करण्याचे निश्चित करण्यात येत आहे. तसेच DBT (Direct Benefit Transfer) Portal वर अद्ययावत माहिती उपलब्ध झाल्यानंतर सदर लाभार्थी योजनेंतर्गत अर्थसहाय्य मिळण्यास पात्र राहतील.

३. शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर संस्थामार्फत मासिक/ त्रैमासिक/ सहामाही लाभ घेत असलेली व्यक्ती तसेच तात्पुरत्या स्वरुपात दिव्यांग असलेली व्यक्ती विशेष सहाय्य योजनेसाठी पात्र असणार नाही. दिव्यांग लाभार्थ्यांना विशेष सहाय्य योजनेचा लाभ घेण्यासाठी युनिक डिसॅबिलिटी आयडी ( Unique Disability ID Card ) कार्ड अनिवार्य करण्यात येत आहे. सदर लाभार्थी पात्र असूनही योजनेचे अर्थसहाय्य मिळण्यापासून वंचित राहिल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित नायब तहसिलदार / तहसिलदार यांची राहील.

४. राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजना आणि केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना या योजनांचे उर्वरीत पात्रतेसाठीचे निकष, अटी व शर्ती संदर्भ क्रमांक १ ते ५ येथील शासन निर्णयाप्रमाणे राहतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३२७२०५५४८७६२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SOMNATH NAMDEO BAGUL

Digitally signed by SOMNATH NAMDEO BAGUL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT, 2.5.4.20=b01714c1480a47cec5943a1c3c73ea95af0534418cf92d1ac844331c4116879d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4807C89831881EDE55B0D82CB9991539D1BD33C6F8A64931D9194D5E2CBDCF56, cn=SOMNATH NAMDEO BAGUL
Date: 2026.03.27 21:00:09 +05'30'

**( सो. ना. बागुल )**
**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा. राज्यपालांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव/ सचिव,
३) मा. उपमुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव/ सचिव,
४) मा.मंत्री, विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव,
५) सर्व जिल्ह्यांचे पालक मंत्री,
६) सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव,
७) सर्व राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,
८) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष,
९) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,
१०) महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
११) सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, कृषि भवन, नवी दिल्ली,
१२) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१४) संचालक, नागरी प्रशासन, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई,
१५) वित्त विभाग (व्यय-१४ / अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई,
१६) सर्व मंत्रालयीन विभाग/सर्व विभागीय आयुक्त /सर्व महापालिका आयुक्त/सर्व पोलीस आयुक्त
१७) सर्व जिल्हाधिकारी / सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक / सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१८) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१९) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२१) विभागीय समाजकल्याण अधिकारी ( मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर)
२२) सर्व उप विभागीय अधिकारी/उप जिल्हाधिकारी (प्रांत अधिकारी) / सर्व तहसिलदार,
२३) सर्व कोषागार अधिकारी / सर्व उप कोषागार अधिकारी,
२४) सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी,
२५) सर्व अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
२६) निवड नस्ती, विसयो.

**विशेष सहाय्य योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्जदार यांच्याकडून घ्यावयाचे**

**"स्वयं घोषणापत्र"**

पासपोर्ट आकाराचे

छायाचित्र येथे

चिकटवावे

मी श्री./श्रीमती -------------------------------------------------------

श्री./श्रीमती ----------------------------------यांचा मुलगा / मुलगी वय -------- वर्षे,

आधार कार्ड क्रमांक ---------------------------------, व्यवसाय - ---------------राहणार -----------------------, ता.------------------, जि.-------------, महाराष्ट्र येथील कायम/तात्पुरता रहिवासी आहे.

मी याद्वारे घोषित करतो/करते की, .............................. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी वरीलप्रमाणे सर्व व्यक्तिगत माहिती माझ्या समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन.

तसेच सदर स्वयंघोषणापत्राद्वारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यात येतील, याची मला पूर्ण जाणीव आहे.

सदरचा मजकुर खरा असून तो खोटा आढळल्यास भारतीय न्याय संहिता, २०२३ या कायद्याच्या कलम २३६, २३७ नुसार मी गुन्ह्यास पात्र राहीन याची मला जाणीव आहे. तसेच कलम २२९ (२) नुसार असलेल्या शिक्षेस पात्र असेन.

**ठिकाण : ----------------** **(सही )**

**दिनांक : ----------------** **अर्जदाराचे नाव : ----------------**